स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

रासेयो/२०२२–२३/८६०  दि. २८/११/२०२२

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित महाविद्यालये,**
**फक्त पुणे शहर व पिंपरी–चिंचवड**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : अवयवदान जनजागृती उपक्रमामध्ये सहभागी होणेबाबत**

**महोदय/महोदया,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इंडीयन मेडीकल असोसिएशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहरातील रासेयो स्वयंसेवकांकरिता अवयवदान जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये पुणे शहरातील रासेयो स्वयंसेवकांकरिता जनजागृतीपर भारूड, पोवाडा, पथनाट्ये, एकपात्री प्रयोग, नृत्यनाटिका इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये पुणे शहरातील जास्तीतजास्त रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवावा.

वरीलप्रमाणे अवयवदान जनजागृती उपक्रम आणि वरीलप्रमाणे स्पर्धांचे आयोजन ४ डिसेंबर, २०२२ रोजी, सायंकाळी ४ ते ६ या वेळेत डॉ. नितू मांडके इंडीयन मेडीकल असोसिएशन हाऊस, ९९२ शुक्रवार पेठ, टिळक रोड, पुणे २ याठिकाणी करण्यात आलेले आहे.

अवयवदान जनजागृतीपर भारूड, पोवाडा, पथनाट्ये, एकपात्री प्रयोग, नृत्यनाटिका स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdWsarxfeWrifQ72aqZEgxs5C8RMRR96vGqHSim03ubGDYb6Q/viewform?usp=pp_url या गुगल फॉर्मद्वारे दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ पूर्वी ऑनलाईन नावनोंदणी करणे आवश्यक आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही याची महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

दिनांक ४ डिसेंबर, २०२२ रोजी सायं. ३.३० वाजता वरीलप्रमाणे नमुद केलेल्या ठिकाणी अवयवदान जनजागृती उपक्रमामध्ये पुणे शहरातील प्रत्येक महाविद्यालयांमधून किमान ४ रासेयो स्वयंसेवक व एक रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना सहभागी होण्याविषयी कळवावे तसेच अवयवदान जनजागृतीपर भारूड, पोवाडा, पथनाट्ये, एकपात्री प्रयोग, नृत्यनाटिका इत्यादी स्पर्धेत गुगल फॉर्मद्वारे ऑनलाईन नावनोंदणी करून सहभागी होण्याकरिता आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांना सूचित करावे. सहभागी स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

*अधिक माहितीकरिता संपर्क : श्री. श्रीकांत आपटे, ९८२००७८२७३*